KNOWLEDGE FLAME
E-ISSN: 3049-1541
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# “कवी धूमील आणि अरुण काळे यांच्या कवितांचा तुलनात्मक अभ्यास”

**प्रा. दीपक भगवानराव राखुंडे**
मराठी विभाग
मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड
dipakrakhunde197@gmail.com

**प्रस्तावना**

आधुनिक काळातील मानवी स्वभाव शहरीकरण ,जागतिकीकरण खासगीकरण, उदारीकरण, बदलते समाजकारण, अर्थकारण आणि राजकारण यासंबंधी भाष्य करण्याचे धारिष्ट्य लेखक, कवींनी दाखवले आहे. आजही ते कथा, कविता आणि कादंबऱ्यातून प्रतिबिंबित होते आहे. नव्या जाणीवा, नवे संदर्भ घेऊन आजची साहित्यकृती समाजाभिमुख बनत आहे. निसर्ग, प्रेम असा रोमांटिक बाज बाजूला सारून माणसांच्या जगण्याचे प्रश्न, समस्या, विफलता, नैराश्य, वेदना विद्रोह असे साहित्यातून विशेषत: कवितेतून वास्तव जगाचे दर्शन घडू लागले आहे. अनेक समस्यांचे मोहोळ कवितेतून उठू लागले. जगण्याची जटीलता, मरणाची भयाणता कवी आपल्या कवितेतून अगदी रास्तपणे व्यक्त करू लागले. हिंदी कवी धूमील आणि मराठीतील कवी अरुण काळे या दोन्ही कवींच्या कवितेतून झिरपणारे नव्या जाणीवांचे संदर्भ लक्षात घ्यावे लागतील.

**१) कवी धूमील आणि कवी अरुण काळे यांच्या कवितांची भाषाशैली :**

हिंदीतील कवी सुदामा पांडे यांनी धूमील या टोपणनावाने काव्यलेखन केले. धूमील यांच्या कवितांचा बाज सडेतोड आणि परखड आहे. त्यांच्या कवितेतून व्यक्त होणारा संताप म्हणजे सर्वसामान्य माणसांच्या प्रश्नांची उत्तरे होय !

'संसद से सडक तक' या कवितेतून जगरहाटीचे वास्तव चित्रण समोर आणले आहे. तसेच अरुण काळे यांच्या कवितेतून सामान्य माणसांच्या व्यथा वेदनांचा हुंकार स्पष्टपणे जाणवतो.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांच्या कवितेचे प्रेरणास्थान आहे म्हणून त्यांची कविता सामाजिक न्यायाशी जोडलेली दिसून येते. त्यांच्या 'ग्लोबलचं गावकूस' या संग्रहातील काही कवितांतून कमालीचे वास्तव समोर येतं. 'आज मुंबईभर' या त्यांच्या कवितेतून मुंबईच्या अंगावरील जखमांचे वर्णन करताना ते म्हणतात,

**"आज मुंबईभर फटाके उडवले बदमाशांनी**

**घरी टीव्ही समोर तुटलेली माणसं बघितली...!"**

यातून क्रौर्याची परिसिमा गाठलेली दिसून येते. मुंबईतील जीवन किती असुरक्षित आहे याची जाण आणि भान त्यांच्या कवितेतून सहज लक्षात येते.

त्याचप्रमाणे हिंदी कवी धूमील आपल्या कवितेतून या देशाचे एकंदरीत चित्रण आपल्यासमोर मांडताना ते म्हणतात की,

**"एक आदमी रोटी बेलता है**

**दुसरा आदमी रोटी से खाता है**

**तिसरा आदमी जो ना रोटी बेलता है**

**ना रोटी खाता है**

**वो सिर्फ रोटी से खेलता है**

**मै पुछता हू**

**वह तिसरा आदमी कौन है**

**मेरे देश की संसद मौन है..."**

वास्तववादी भाषेतून त्यांनी आपल्या देशाचे चित्रण केले आहे. दोघांचीही भाषाशैलीतून व्यवस्थेवरील संताप व्यक्त होताना दिसतो आहे. महानगराचा पसारा त्यांनी चपखल भाषेच्या माध्यमातून आपल्या कवितेत टिपला आहे.

**२) कवी धूमील आणि कवी अरुण काळे यांच्या कवितेतील वास्तववाद -**

झपाट्याने होत असलेल्या शहरीकरणाचे पडसाद अलगदपणे धूमिल यांच्या कवितेतून पडतात. मध्यमवर्गीय माणसांची व्यथा त्यांच्या धारदार लेखणीतून व्यक्त होते. व्यवस्थे विरोधातील संघर्ष, माणसातील द्वेष, मत्सर त्यांच्या कवितेतून प्रकट होत जातो.

**'आज मै लढ रहा हू' या कवितेतून त्यांनी वास्तववाद व्यक्त केला आहे,**

**"फुलो की हसी के खिलाफ जंजिरे खनखना रही है**

**और रिश्ते मुहावरा बदलने की फिराक मे है**

**आज अंधेरा है और खून लगा हुआ है हाथो मे**

**जिसे हमने हासिल किया है**

**वह पालने मे नही रक्त लथपथ**

**कराहो की बगल मे पडा है"...**

यातून कवी धूमील यांनी कमालीचे वास्तव मांडले आहे. मनाच्या विरुद्ध चाललेली ही घुसमट येथे स्पष्टपणे प्रतिबिंबीत होते. तसेच अरुण काळे यांच्या कवितेतील वास्तववाद

सामाजिक विषमतेची जाणीव करून देणारा आहे. 'निमित्त घाटकोपर कांड' या कवितेतून त्यांनी या सामाजिक विषमतेचा प्रश्न अधोरेखित केला आहे. हे सामाजिक वास्तव खरोखरच अस्वस्थ करणारे वाटते. ते म्हणतात की,

**"आज त्यांची अंत्ययात्रा आहे**

**जे काल एकगठ्ठा मेले**

**कुणीतरी विचारलं.. त्यांना सवलतीत जाळता येईल का?"....**

सामाजिक वास्तवतेची ही प्रखरता, दाहक जाणीव खरोखरच हृदयाला भिडणारी वाटते. १९९० नंतरच्या कवींनी आपल्या कवितांमधून समाजाचे खरेखुरे दुखणे जगासमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**३) अरुण काळे आणि धूमील यांच्या कवितेतील आशयघनता -**

कवी धूमील यांची कविता सामाजिक परिवर्तनासाठी साद घालते. त्यासाठी संघर्षाचा, बंडाचा झेंडा उभा करते. ते एका कवितेतून असे म्हणतात की ,

**"सोचते क्या हो**

**अपने शर्म मे डूब मरने का कोई दुसरा उपाय ढुंढ लो**

**हो चुके हो तुम बाजार से बाहर"....**

व्यवस्थेला प्रश्न विचारणारी त्यांची कविता निर्भीडपणे पुढे आलेली दिसून येते. त्यांची कविता एका व्यक्तीसाठी नाही तर समष्टीसाठी आवाज उठवणारी आहे. त्यांच्या कवितेची आशयघनता खरोखरच महत्त्वपूर्ण आहे. कवी अरुण काळे यांच्या कविता मूळात गंभीर प्रकृतीच्या आहेत. त्यात परिवर्तनाच्या ठिणग्या निथळताना दिसतात. महानगरीय संवेदना जागजागी व्यक्त होतात. ते आपल्या कवितेतून व्यक्त होतात की,

**"वर्गविहीन शोषणरहित माणसाचं जागतिकीकरण हाणून पाडू**

**आता विषमतेच्या साम्राज्याला दिलं नाव ग्लोबलगाव**

**महानगराचं गाव करून येड्यात काढलं की काय राव!"....**

शोषितांचे दु:ख, वर्गसंघर्ष हा त्यांच्या कवितांनी पुढे केलेला आगडोंब आहे.यात झालेली होरपळ मनाला कासावीस करणारी आहे. रुपेरी स्वप्न दाखवणारी त्यांची कविता नाही तर आरपार भिडणारे प्रश्न घेऊन धाडसाने जगासमोर येणारी त्यांची कविता आहे. आशय आणि विषयाची कुठेही गफलत होताना दिसून येत नाही.

**४) कवी धूमील आणि अरुण काळे यांच्या कवितेतील सामाजिक जाणीवा -**

समाज व्यवस्थेवरील अन्याय, अत्याचाराचा अगदी परखडपणे समाचार घेते ती कवी अरुण काळे यांची कविता ! त्यांच्या कविता सामाजिक भान जपताना दिसतात. माणसाला 'वेद'

कळाला नाही तरी हरकत नाही पण माणसाला माणसांच्या 'वेदना कळणे गरजेचे आहे. अरुण काळे यांच्या कवितातून माणसांच्या वेदना कळतात. विद्रोह ठळकपणे जाणवतो. प्रस्थापितांविरुद्ध त्यांची कविता बंड करते. त्यांच्या सायरनचे शहर या कवितासंग्रहातील अनेक कवितांमधून सामाजिक जाणीवा गोचर होताना दिसतात. तसेच 'नंतर आलेले लोक' या काव्यसंग्रहातून सामाजिक जाणीवांचा त्यांनी वेध घेतलेला दिसून येतो.

त्याचप्रमाणे कवी धूमील यांनीही आपल्या कवितांमधून सामाजिक विषमतेची पाळेमुळे जगासमोर उघडी केली आहे. समाजव्यवस्थेतील जातीयता, विषमता अस्वस्थ करणारी होती, मनाला अंतर्मुख करणारी होती. अशा सामाजिक विषमतेवर कवी धूमील अगदी प्रामाणिकपणे व्यक्त होताना दिसतात..

**"रापी से उठी हुई आंखो ने**
**मुझे क्षणभर टटोला और फिर**
**वह हसते हुए बोला, बाबूजी**
**सच कहू मेरी निगाहों मे न कोई छोटा है न कोई बडा है"..**

उपरोक्त 'मोचीराम' या कवितेतून वेगवेगळ्या स्तरातून आलेल्या लोकांच्या बुटांची पॉलीश, दुरुस्ती करताना मात्र कोणतीही सामाजिक विषमता मनात ठेवता येत नाही, ही जाणीव करून देणारी त्यांची महत्त्वपूर्ण कविता आहे.

**५) कवी धूमील आणि अरुण काळे यांच्या कवितेतील चिंतनशीलता -**

कवी धूमील यांच्या कवितांमधून विविध विषयांचे पदर घेऊन सामाजिक चिंतन उमटलेले दिसून येते. नव्या प्रतिमा वापरून त्यांची कविता अधिक उजळून निघते, "मैने जब भी उनसे कहा की देश, शासन और राशन उन्होने मुझे टोक दिया है अक्सर भी मुझे अपराध के असली मुकाम पर अंगुली रखने से मना करते है"...

देशाची वास्तव परिस्थिती त्यांनी आपल्या कवितेतून अधोरेखित केली आहे. त्यांचे हे चिंतन वाचकांना नवी दृष्टी देणारे वाटते.

कवी अरुण काळे यांनी आपल्या 'रॉकगार्डन' सारख्या कवितासंग्रहातून विषयानुरूप सामाजिक चिंतन मांडले आहे. तसेच त्यांच्या काही कवितांमधून आपल्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचा चिंतनशीलपणे केलेला उल्लेख तितकाच महत्त्वाचा वाटतो. 'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा' या कवितेतून अरुण काळे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा संगणकीय प्रतिमांनी अधिक प्रभावीपणे मांडली आहे. हजारो वर्षांची पारंपरिक मेमरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराच्या अपडेट प्रोग्राम ने डिलीट करून टाकली आहे. संगणकीय प्रतिमांनी आपल्या कवितेतून एक चिंतन ते मांडताना दिसतात.

**समारोप -**

कवी अरुण काळे आणि सुदामा पांडे उर्फ कवी धूमील यांनी आपापल्या कवितांमधून नवनवीन प्रतिमा वापरून समाजवास्तव, देशाचे भवितव्य, माणसांची अगतिकता , सामाजिक विषमता, बदलते समाजकारण, राजकारण प्रतिबिंबित केले आहे. या दोन्ही कवींनी जगरहाटीला डोळ्यासमोर ठेवून वास्तवाला भिडणाऱ्या तसेच सामाजिक जाणीवा असणाऱ्या कवितांना आपल्या चिंतनाचा विषय बनवला आहे. एकंदरीत त्यांच्या कविता या आधुनिक युगाच्या प्रतिनिधित्व करणाऱ्या वाटतात.

**संदर्भ-**

१) काळे अरुण, सायरनचे शहर, ललित पब्लिकेशन , मुंबई
२) धूमील, संसद से सडक तक, वाणी प्रकाशन, नई दिल्ली
३) काळे अरुण, रॉकगार्डन, लोकवाड्मयगृह,मुंबई
४) धूमील, कल सुनना मुझे, वाणी प्रकाशन, नई दिल्ली
५) रसाळ सुधीर, कविता आणि प्रतिमा, मौज प्रकाशन, मुंबई
६) भवरे महेंद्र, दलित कविता आणि प्रतिमा, लोकवाड्मयगृह, मुंबई.